सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १२४ | शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री.अश्विन पाटील**
पक्षीमित्र/ शिक्षक



**श्री. शंकर भित्रे**
व्यापारी



**डॉ. निखिल बहुगुणे**
अमळनेर



**प्रा. श्री. राजेंद्र बडगुजर**
निवृत्त प्राध्यापक



**श्री. हरीष लुल्ला**
व्यापारी

## दिनविशेष
२४ जानेवारी

- भारताच्या संविधानावर स्वाक्षरी झाली
- इंदिरा गांधी यांनी भारताच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
- एअर इंडियाचे कांचनजंगा विमान युरोपमधील आल्प्समधील माँट ब्लँक येथे कोसळले. या अपघातात भारतीय अणुविज्ञानाचे शिल्पकार डॉ. होमी जहांगीर भाभा यांचे निधन झाले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!



अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी श्री विद्याविनायक यागास प्रारंभ झाला होता. शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी यागाची पूर्णाहूतीने सांगता झाली. याप्रसंगी उपस्थित द्रौ. रा. कन्या शाळेच्या विद्यार्थिनी. (छायाचित्र : मयूर चौधरी)

## श्री मंगळग्रह मंदिरात श्री विद्याविनायक यागाची पूर्णाहूतीने सांगता

### द्रौ. रा. कन्या शाळेतील ९ विद्यार्थिनींचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षीप्रमाणे श्री गणेश जयंती व वसंत पंचमीनिमित्त गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी सकाळी श्री विद्याविनायक यागास प्रारंभ झाला होता. शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी दुपारी दोनला द्रौ. रा. कन्या शाळेच्या नऊ विद्यार्थिनींच्या हस्ते श्री विद्याविनायक यागाची पूर्णाहूतीने सांगता झाली. वसंत पंचमीनिमित्त श्री मंगळग्रह देवतेचा केशर जलाद्वारे अभिषेक करण्यात आला.

सुरुवातीला स्थापित देवतांची प्रात:पूजा करण्यात आली. श्री गणेश व सरस्वती मातेचे ब्रह्मनस्पती सुक्त व मेधा सुक्त या यजुर्वेदीय सुक्तांनी अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सरस्वती मातेला पांढऱ्या पुष्पाने अर्चन करण्यात आले. त्यानंतर १ हजार मंत्रांनी सरस्वती मातेस हवन कन्यांच्या माध्यमातून करण्यात आले. या कर्माची सांगतेसाठी मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी व सचिव सुरेश बाविस्कर यांच्या हस्ते पूर्णाहूती पार पडली. त्यानंतर महाआरतीने श्री विद्याविनायक यागाची सांगता झाली. तुषार दीक्षित गुरुजी, प्रसाद भंडारी गुरुजी, वैभव लोकाक्षी गुरुजी, शुभम् वैष्णव गुरुजी, यश जोशी गुरुजी, परशुराम शर्मा गुरुजी यांनी पौरोहित्य केले.

**राजमाता अहिल्यादेवी वारसास्थळ प्रकरण**

# अमळनेरला विविध संघटनांतर्फे निषेध; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला वाराणसी येथील मनिकर्णिका घाट उध्वस्त केल्याप्रकरणी देशभरात तीव्र पडसाद उमटले आहेत. या घटनेचा येथील विविध सामाजिक संघटनांनीही शुक्रवार, दि. २३ जानेवारी रोजी निषेध व्यक्त केला आहे. प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदनही देण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांनी " येळकोट येळकोट जय मल्हार " अशा घोषणा दिल्या. देवाच्या नावाने भंडारा उधळत, हळद उधळून निषेध केला. निवेदनात म्हटले आहे, की राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण भारतभर धर्म, समाज आणि संस्कृती जपण्यासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. मात्र, त्यांचे ऐतिहासिक



*अमळनेर : प्रांताधिकारी मयुर भंगाळे यांना शुक्रवारी निषेधाचे निवेदन देताना काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, प्रा. अशोक पवार, शेजारी संदीप घोरपडे, बन्सीलाल भागवत, एस. सी. तेले, श्याम पवार, नितीन निळे व विविध संघटनांचे पदाधिकारी आदी.*

वारसास्थळ नष्ट करणे हे दूर्दैवी व निषेधार्ह आहे. मनिकर्णिका घाटावरील ऐतिहासिक स्मारकाची तोडफोड करून त्यांच्या कार्याला पुसण्याचा प्रयत्न केला जात आहे. या घटनेने धनगर समाजबांधवांसह विविध जाती, धर्म, पंथातील नागरिकांच्या भावना दुखावल्या आहेत. भविष्यात महापुरुषांच्या स्मृतींना धक्का लावणाऱ्या कारवाया थांबवाव्यात. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस व म.सा.प.चे तालुकाध्यक्ष संदीप घोरपडे, मौर्य क्रांती संघाचे प्रदेश उपाध्यक्ष बन्सीलाल भागवत, राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलचे तालुकाध्यक्ष एस. सी. तेले, युवा कल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अशोक पवार, भाजयुमोचे शहराध्यक्ष देवा लांडगे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख (उबाठा) नितीन निळे, हमाल मापाडी संघटना तालुकाध्यक्ष रमेशदेव शिरसाट, काँग्रेसचे शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, मौर्य क्रांती संघाचे तालुकाध्यक्ष गोपीचंद शिरसाट, खानदेश साहित्यिक संघाचे जिल्हाध्यक्ष व कवी शरद धनगर, मच्छिंद्र लांडगे, जिभाऊ कंखरे, लोटन चौधरी, ओबीसी असोसिएशनचे उपाध्यक्ष डी. ए. सोनवणे, स्टडी सेंटर संचालक मौलाना रियाज शेख, प्रा. शाम पवार, ॲड. तिलोतमा पाटील, ॲड. चारु शिंदे, रज्जाक शेख, शरद पाटील, राजेंद्र पाटील, विष्णू पाटील, जयदीप सिसोदिया, किशोर पवार, भानुदास सैंदाणे, डॉ. महेश पाटील, किशोर धनगर, आर. टी. पाटील, गणेश कासार, ए. सी. सोनवणे, एच. टी. नंदवे, एस. ए. साळुंखे, ए. एस. पाटील, पी. पी. माळी, एस. व्ही. सैय्यद, अतुल धनगर, हाजी दबीर पठाण, भगवान संदानशिव, डॉ. रवींद्र पाटील, जयवंत पवार, सुधाकर भैसे, अशोक पाटील, प्रकाश पाटील आदी उपस्थित होते.

# मांजरीपाडाच्या हॉटेल मालकाचा प्रामाणिकपणा

### अमळनेरचे इंजि. प्रशांत बडगुजरांची हरवलेली ६ ग्रॅम अंगठी केली परत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बांधकाम इंजि. प्रशांत बडगुजर यांची हरवलेली सोन्याची अंगठी पिंपळनेर तालुक्यातील मांजरीपाडा येथील एका हॉटेल मालकाने प्रामाणिकपणे परत केली आहे. ही घटना रविवार, दि. १८ जानेवारी रोजी घडली होती. त्यांच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती, अशी की येथील एस. पी. कन्स्ट्रक्शनचे इंजि. प्रशांत बडगुजर यांची साक्री तालुक्यात बांधकामाचे काम सुरू आहे. ते १८ जानेवारी रोजी साईटवर पाहणीसाठी गेले होते. यावेळी ते मांजरीपाडा (ता. पिंपळनेर) येथील हॉटेल कोकणी येथे जेवणास गेले होते.



स्वेटर काढताना त्यांची अंगठी खाली पडली होती. अंगठी हरवल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी हॉटेल कोकणीचे मालक रोहिती गांगुर्डे यांच्याशी संपर्क साधला. श्री. गांगुर्डे यांना दुसऱ्या दिवशी सकाळी हॉटेलची साफसफाई करत असताना अंगठी आढळून आली. त्यांनी इंजि. बडगुजर यांना अंगठी सापडल्याचे सांगून भ्रमणध्वनीवर अंगठीचे छायाचित्र टाकून शहानिशा केली. त्यानंतर मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी इंजि. बडगुजर यांनी मांजरीपाडा येथे श्री. गांगुर्डे यांच्याकडून अंगठी ताब्यात घेतली. इंजि. बडगुजर यांनी श्री. गांगुर्डे यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक करून त्यांचा सत्कारही केला. हल्लीच्या स्वार्थी युगात हरविलेल्या मौल्यवान वस्तू मिळणे मुश्किल असते. मात्र, श्री. गांगुर्डे यांनी प्रामाणिपणा दाखवून माणुसकीचे दर्शन घडविल्याच्या भावना इंजि. बडगुजर यांनी व्यक्त केल्या.

# कसे दूर करावे डिप्रेशन दूर?, 'हे' सोपे उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सतत उदास वाटत असेल तर काही सोपे उपाय त्यातून बाहेर पडण्यास मदत करतील.

मनातल्या गोष्टी : मनातल्या भावना दाबून ठेवू नका. अनेकदा मनातल्या गोष्टी बाहेर काढल्याने मन हलके होते.

**दिवसाचे वेळापत्रक** : दिवसाचे एक साधे वेळापत्रक बनवा. सकाळी उठण्यापासून रात्री झोपण्यापर्यंतची कामे ठरलेली असतील तर मेंदूला दिशा मिळते.



हालचाल आणि व्यायाम : व्यायाम केल्याने शरीरात 'एंड्रॉर्फिन' नावाचे 'फील गुड' हार्मोन्स तयार होतात, जे तणाव कमी करण्यास मदत करतात.

**झोप** : झोप पूर्ण न झाल्याने चिडचिड आणि नैराश्य वाढते. दररोज ७-८ तासांची शांत झोप घ्या.

आहार : आहारात ताज्या भाज्या, फळे आणि सुकामेवा यांचा समावेश करा. जंक फूड टाळा. छंद जोपासा. तुम्हाला जे करायला आवडते त्यासाठी वेळ काढा.

# खा. शि. मंडळाच्या शाळा, महाविद्यालय समिती चेअरमन, सदस्यांची निवड

### आशीर्वाद पॅनलच्या सर्व नवनिर्वाचित संचालकांना लाभली चेअरमनपदाची संधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळांच्या विविध शाळा, महाविद्यालय समिती चेअरमन व सदस्यांची गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी झालेल्या विशेष सभेत निवड जाहीर करण्यात आली आहे. यात प्रताप महाविद्यालय, तीन्ही माध्यमिक व प्राथमिक शाळा, पीबीई इंग्रजी स्कूल, (कै.) पी. सी. भांडारकर कॉलेज ऑफ डी फार्मसी व इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्लॉलॉजीचा समावेश आहे.



**नीरज अग्रवाल**



**हरी भिका वाणी**



**योगेश मुंदडे**



**डॉ. संदेश गुजराथी**



**जितेंद्र जैन**



**प्रदीप अग्रवाल**

**शाळा, महाविद्यालय समिती अध्यक्ष, सदस्य असे**

**प्रताप महाविद्यालय** : चेअरमन- नीरज अग्रवाल. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी.

**प्रताप हायस्कूल** : चेअरमन- नीरज अग्रवाल. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी.

**जी. एस. हायस्कूल** : चेअरमन- हरी भिका वाणी. सदस्य- प्रदीप अग्रवाल, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी.

**द्रौ. रा. कन्या शाळा** : चेअरमन- योगेश मुंदडे. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी.

**पीबीए इंग्रजी स्कूल** : चेअरमन- डॉ. संदेश गुजराथी. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन.

(कै.) आर. एस. पाटील, (कै.) एस. पी. भांडारकर व सौ. एम. एस. राणे प्राथमिक शाळा : चेअरमन- जितेंद्र जैन. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, डॉ. संदेश गुजराथी.

(स्व.) पंढरीनाथ छगनशेट भांडारकर कॉलेज ऑफ डी फार्मसी व (कै.) प्रा. आर. के. केले कॉलेज ऑफ बी फार्मसी : चेअरमन- प्रदीप अग्रवाल. सदस्य- हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, डॉ. संदेश गुजराथी.

**इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजी** : चेअरमन- जितेंद्र जैन. सदस्य- प्रदीप अग्रवाल, हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, डॉ. संदेश गुजराथी, संचालक- प्रा. डॉ. व्ही. एम. पाठक.

दरम्यान, समन्वय समितीत शाळा, महाविद्यालयांचे चेअरमन, सदस्यांचा समावेश आहे. तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्यांचा आमंत्रित सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती खानदेश शिक्षण मंडळाचे चिटणीस प्रा. पराग पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.



# फिनलँडमध्ये मोठा प्रयोग यशस्वी!

## केबलशिवाय हवेतून वीजपुरवठा करून दाखविणारा ठरला पहिला देश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फिनलँडमधील शास्त्रज्ञांनी वीजतारांशिवाय इलेक्ट्रिसिटी ट्रान्समीट करून क्रांती घडविली आहे. शास्त्रज्ञांनी हाय इंटेन्सिटी साऊंड वेव्ह आणि लेसर यांचा एकत्रित वापर करून इलेक्ट्रिसिटी ट्रान्समीट करण्याचा प्रयोग केला. शोधकर्त्यांना प्लग, वायर आणि विजेची पारंपरिक कनेक्शनशिवाय वीजपुरवठा करायचा होता. त्यांच्या या नव्या यशामुळे घराघरात पोहोचणारी वीज, फॅक्ट्री आणि उपकरणांचा चेहरा मोहराच बदलणार आहे.



### नेमके फिनलँडमध्ये झाले काय?

फिनलँडमधील शास्त्रज्ञांनी हवेतून इलेक्ट्रिसिटी ट्रान्समीट करण्याचा यशस्वी प्रयोग केला. यासाठी त्यांनी अल्ट्रासोनिक साऊंड वेव्ह, लेसर आणि रेडिओ फ्रिक्वेन्सीचा वापर केला. या प्रयोगाला यश आले आहे आहे. त्यामुळे आचा प्लग, केबल वायर याच्याशिवायही इलेक्ट्रिसिटी घराघरात पोहोचविणे शक्य आहे, हे सिद्ध झाले आहे.

### कोणी केले हे क्रांतिकारी काम?

हेलेन्स्की विद्यापीठ आणि ओऊलू विद्यापीठ यांच्या टीमने हा प्रयोग केला. यासाठी त्यांनी पॉवर बाय लाईट आणि रेडिओ फ्रिक्वेन्सीबाबत काम करणाऱ्या खासगी कंपनींचे देखील सहकार्य घेतले. प्रॅक्टिकल निष्कर्षासाठी या प्रोजेक्टमध्ये फिजिक्स, इंजिनिअरिंग आणि कटिंग एज इनोव्हेशनचा वापर करण्यात आला. आता हवेतून वीज वाहून नेण्याचा प्रयोग करणारा फिनलँड हा जगातील सर्वांत पहिला देश ठरला आहे.

### ऑकोस्टिक वायर म्हणजे काय?

ऑकोस्टिक वायर हे हाय इंटेन्सिटी अल्ट्रासोनिक साऊंड वेव्हचा वापर करून विजेच्या प्रवाहाला दिशा देते. ते हवेत एक अदृष्य वीज वाहून नेण्याचा मार्ग तयार करते. हे लाटेसारखेच काम करते. इलेक्ट्रिक स्पार्क या अल्ट्रासोनिक मार्गाने सुरक्षितरित्या कोणत्याही स्पर्शाशिवाय ट्रॅव्हल करतात. यामुळे विजेची उपकरणे आणि स्मार्ट उपकरणांना कॉन्टॅक्टलेस पॉवर डिलिव्हरी शक्य होते.

### ही वायरलेस इलेक्ट्रिसिटी नाही

जरी या पद्धतीने हवेतून इलेक्ट्रिसिटी वाहून नेता येत असली, तरी हे तंत्रज्ञान वायरलेस म्हणता येणार नाही. फिनलँडच्या संशोधकांनी टीमने फिल्ड गायडेड एनर्जी निर्माण केली आहे. ही एनर्जी फ्री फ्लोटिंग पॉवर नाही. अल्ट्रासोनिक वेव्ह हे छोट्या स्पार्क्सना एका विशिष्ठ मार्गातून पुढे ट्रान्समीट करतात. लेसर लाईटचे रूपांतर अगदी छोट्या इलेक्ट्रिसिटीमध्ये अत्यंत सुरक्षित पद्धतीनं डिलिव्हर करते. रेडिओ फ्रिक्वेन्सी आजूबाजूला अस्तित्वात असलेले मायक्रोवॅट कलेक्ट करते.

### हे कसे साध्य झाले?

संशोधकांनी विशिष्ट अशी अल्ट्रासोनिक बीम आणि लेसर सिस्टीम तयार केली. ज्यातून इलेक्ट्रिसिटीला दिशा देता येईल. त्यानंतर लेसरद्वारे ही ऊर्जा दूरवरच्या रिसिव्हरपर्यंत ट्रान्समीट केली. यावेळी गॅल्वेनिक आयसोलेशनचा देखील वापर करण्यात आला. त्यानंतर रेडिओ फ्रिक्वेन्सीचा वापर करून अम्बियन्ट वेव्हचे रूपांतर इलेक्ट्रिस्टीमध्ये करण्यात आले. या सर्व पद्धतींचा वापर करून इलेक्ट्रिसिटी ही सुरक्षितरित्या आणि प्रभावीपणे हवेतून ट्रान्समीट करता येते हे दिसून आले.

### फिनलँड पहिला देश?

जगात वायरलेस चार्जिंग फोन आणि छोटे डिव्हाईस अस्तित्वात आहेत. मात्र फिनलँड पहिला देश आहे ज्याने खरी इलेक्ट्रिसिटी हवेतून सुरक्षितरित्या ट्रान्समीट करून दाखविली आहे. यासाठी त्यांनी मोठ्या स्तरावर केलेला साऊंड, लाईट आणि रेडिओचा उपयोग हा पारंपरिक गोष्टींना छेद देणारा ठरला आहे. इतर देशांनी छोट्या प्रमाणावर अशा प्रकारचा प्रयोग केला आहे. मात्र फिनलँडने याचे मोठ्या प्रमाणावर प्रॅक्टिकल करून देखवत आघाडी घेतली आहे.

या नव्या प्रयोगामुळे पारंपरिकरित्या वीज वाहून नेण्यासाठी वायरची गरज लागते यालाच छेद गेला आहे. या प्रयोगामुळे कल्पकता, अचूकता आणि नावीन्यपूर्ण भौतिकशास्त्र जुन्या समस्याही सोडवू शकते हे दिसून आले. यामुळे आता घराघरात, कारखाना आणि उद्योगधंद्यांना केबल फ्री इलेक्ट्रिसिटी पुरविण्यासाठीची दारे उघडली गेली आहेत.

# इंजिनिअर दाम्पत्यांचा शेती करण्याचा निर्णय

## झिरो केमिकल मॉडेलला मिळाले यश, उभारले मोठे साम्राज्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी




एका सॉफ्टवेअर इंजिनियर असलेल्या दांपत्याने नोकरी सोडून शेती करण्याचा निर्णय घेतला. झिरो केमिकल मॉडेलचा अवलंब करून आज मोठे साम्राज्य त्यांनी उभारले आहे.

बंगळुरूत २०१४ पासून स्थायिक असलेल्या या जोडप्याने २०२१ मध्ये आपल्या मूळ गावी परत येऊन १५ एकर वडिलोपार्जित जमिनीवर रासायनिक खतांचा वापर न करता नैसर्गिक आणि सेंद्रिय शेती करण्याचा धाडसी निर्णय घेतला. 'झिरो केमिकल' या संकल्पनेतून सुरू झालेल्या या प्रवासात त्यांनी परराज्यातून लाल माती मागवली. जीवामृतसारख्या पारंपरिक खतांचा वापर करून जमीन सुपीक बनविली. 'तुही फार्म्स' या ब्रँड अंतर्गत हळद, मोहरीचे तेल, दलिया आणि बेसन यांसारखी सेंद्रिय उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांचे 'फार्म-टू-फोर्क' मॉडेल केवळ मध्यस्थांसाठीच नाही, तर दिल्ली आणि बंगळुरूसारख्या शहरांमध्ये निष्ठावान ग्राहक वर्ग तयार होत आहे.

### गावी स्थलांतर, सेंद्रिय शेती

कानपूरच्या रश्मी आणि अंकुर सचान असे या दांपत्याचे नाव आहे. २०२१ मध्ये बंगळुरूमधील धावपळीचे जीवन सोडून कानपूरला स्थलांतर करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. शेतीचा अनुभव नसतानाही त्यांनी रसायनांचा वापर न करण्याचा निश्चय केला. रश्मीने सेंद्रिय खते, पीक फेरपालट आणि आंतरपीक पद्धती शिकण्यासाठी अनेक कार्यशाळांमध्ये भाग घेतला. २०२२ मध्ये त्यांनी आपली जमीन तयार केली. मातीची सुपीकता वाढविण्यासाठी राजस्थानमधून लाल मातीचा एक ट्रक मागवला. या मातीत लोह आणि आवश्यक पोषक तत्वे भरपूर प्रमाणात होती. यासोबतच त्यांनी गांडूळ खत, कडूलिंब आणि मोहरीच्या पेंडीचे मिश्रण तयार करून रोपांची लागवड सुरू केली. शेतात या जोडप्याने फळे आणि लाकडासाठी ३५ हून अधिक प्रकारची झाडे लावली.

### झाडांची लागवड

जैवविविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी चिंच, वड आणि पिंपळ यांसारखी झाडे लावली गेली. तर, व्यावसायिक दृष्ट्या पपई, केळी, आंबा आणि चिकूची लागवड सुरू केली. भविष्यातील आर्थिक सुरक्षिततेसाठी, म्हणजेच 'रिटायरमेंट प्लॅनिंग' म्हणून त्यांनी शेताच्या सीमेवर सागवान आणि महोगनीची २५० झाडे लावली. जी २० वर्षांनंतर फर्निचरच्या लाकडासाठी विकली जातील. सध्या ते आपल्या १५ एकर जमिनीपैकी ५. ५ एकरवर सक्रियपणे आंतरपीक आणि बहुपीक पद्धतीचा अवलंब करत आहेत. माती सुपीक ठेवण्यासाठी हे जोडपे शेतातच जीवामृत आणि 'दशपर्णी अर्क' यांसारखी सेंद्रिय कीटकनाशके तयार करते. त्यांनी २१ दिवस तांब्याच्या संपर्कात ठेवलेल्या 'ताकाचा' वापर करून मातीची सुपीकता टिकवून ठेवण्याचा स्वस्त आणि प्रभावी मार्ग अवलंबला आहे.

### पीक, यशाचे सूत्र

सिंचनासाठी रश्मी आणि अंकुर यांनी पीक आणि जमिनीच्या रचनेनुसार ठिबक आणि तुषार सिंचन प्रणाली बसविली आहे. कापणीनंतर ते मूग आणि उडीद यांसारखी डाळींची पिके घेतात. जी मातीतील नायट्रोजन स्थिरीकरणाद्वारे नैसर्गिकरित्या पोषण वाढवतात. पती- पत्नीच्या यशाचे सर्वात मोठे सूत्र म्हणजे मध्यस्थांना वगळून थेट ग्राहकांपर्यंत पोहोचणे.

### उत्पादने

'तुही फार्म्स' या ब्रँड अंतर्गत ते हळद पावडर ६०० रुपये किलो, पिवळी मोहरीचे तेल २८० रुपये लीटर आणि बेसन १८० रुपये किलो दराने विकत आहेत. त्यांनी प्रक्रिया करण्यासाठी स्वतः च्या यंत्रसामग्रीचीही उभारणी केली आहे. त्यांची ताजी फळे आणि भाज्या आयआयटी कानपूरच्या सोसायटीसोबतच दिल्ली आणि बंगळुरूमधील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. लोक सेंद्रिय असल्यामुळे या उत्पादनांसाठी अधिक किंमत देण्यास आनंदाने तयार आहेत. या व्यवसायातून हे जोडपे चांगली कमाई करत आहेत.

# ताऱ्यांची अचूक गणिते मांडून वाजवला सातासमुद्रापार डंका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

येस! एका मराठी माणसाने पुन्हा एकदा आकाशातील ताऱ्यांची अचूक गणिते मांडून सातासमुद्रापार डंका वाजवलाय. रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सुवर्णपदक मिळविणे ही काही खाऊची गोष्ट नाही. पण श्रीनिवास कुलकर्णी यांनी ते करून दाखविले आहे.

या 'खगोलशास्त्रीय' विजयाची गोष्ट. अहो, हे मेडल म्हणजे 'विज्ञानातील ऑस्कर'च समजा. रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सुवर्णपदक म्हणजे खगोलशास्त्राच्या जगातला सर्वोच्च सन्मान. हे तेच पदक आहे जे एकेकाळी अल्बर्ट आइनस्टाइन, स्टीफन हॉकिंग आणि एडविन हबलसारख्या दिग्गजांना मिळाले होते. आता त्या यादीत श्रीनिवास कुलकर्णी हे नाव कोरले गेले आहे.

हे मेडल मिळविणारे ते काही पहिले भारतीय नाहीत (याआधी होमी भाभा आणि जयंत नारळीकर यांचा सन्मान झाला आहे). पण ज्या कामासाठी त्यांना हे मिळाले आहे ते खरोखर 'आऊट ऑफ धिस वर्ल्ड' आहे.

### नक्की केले काय या माणसाने?

आपल्याला वाटत असेल कुलकर्णी फक्त दुर्बिणीतून चांदण्या बघत बसतात, तर तसे नाही. त्यांनी आकाशाचा अभ्यास करण्याची पद्धतच बदलून टाकली.

त्यांनी 'झ्विकी ट्रान्झिएंट फॅसिलिटी' नावाचा एक प्रोजेक्ट उभा केला. सोप्या भाषेत सांगायचे तर आपण रात्री आकाश बघतो तेव्हा सगळे शांत वाटते. पण प्रत्यक्षात तेथे सतत काहीतरी 'फटाके' फुटत असतात. तारे मरतात. ब्लॅक होल्स ताऱ्यांना गिळतात.

कुलकर्णींच्या 'झ्विकी ट्रान्झिएंट फॅसिलिटी'ने आकाशाचा असा 'लाईव्ह कॅमेरा' लावला की या सेकंदाला घडणाऱ्या घटनांची नोंद लगेच होते.

त्यांच्या या कामामुळे आपल्याला 'मिलिसेकंद पल्सार्स' आणि 'ब्राऊन ड्वार्फ'सारख्या भयंकर क्लिष्ट गोष्टी समजायला सोपे गेले.

### मराठी कनेक्शन आणि 'रॉयल' थाट

श्रीनिवास कुलकर्णी यांचा जन्म महाराष्ट्रातल्या कुरुंदवाडचा (कोल्हापूर जिल्हा). त्यांचे बालपण आणि शिक्षण हुबळीत झाले असले, तरी त्यांची कामाची पद्धत आणि जिद्द अगदी आपल्या 'मराठी मातीतल्या' संशोधकांसारखी आहेकमी संसाधनांत जास्तीत जास्त आऊटपूट. सध्या ते अमेरिकेतील जगप्रसिद्ध 'कॅलटेक' मध्ये प्रोफेसर आहेत. पण एवढ्या मोठ्या उंचीवर जाऊनही त्यांची जिज्ञासा एखाद्या लहान मुलासारखी आहे. ते म्हणतात ना, की 'ज्याला कुतूहल आहे, तोच खरा वैज्ञानिक'.


### ऐतिहासिक वारसा : गॅलिलिओ ते कुलकर्णी

जेव्हा आपण ऐतिहासिक संदर्भात बघतो तेव्हा लक्षात येते, की भारताचा खगोलशास्त्राशी संबंध आर्यभट्टांच्या काळापासून आहे. पण मधल्या काळात आपण थोडे मागे पडलो होतो. श्रीनिवास कुलकर्णी यांच्यासारख्या लोकांमुळे पुन्हा एकदा जागतिक नकाशावर भारतीय मेंदूचा प्रभाव दिसू लागला आहे.

हे मेडल फक्त एका व्यक्तीचा सन्मान नाही, तर "आम्ही पण विश्वाचे रहस्य उलगडू शकतो" या विश्वासाचा विजय आहे.

### जाता जाता...

आपण रोज रात्री आकाशाकडे बघून फक्त 'चांदोबा चांदोबा' करतो किंवा राशीभविष्य शोधतो. पण कुलकर्णींसारखी माणसे त्याच आकाशात गणिताची सूत्रे आणि विज्ञानाची नवी क्षितिजे शोधत असतात. पुढच्या वेळी जेव्हा आपण एखादा तारा तुटताना बघाल तेव्हा तो 'विश' मागण्यासाठी न वापरता त्यामागे काय विज्ञान असेल याचा विचार करून बघा. कुलकर्णींना मिळालेल्या सुवर्णपदकाचा तोच खरा सन्मान ठरेल. तुम्हाला काय वाटते?. भारतात अशा जागतिक दर्जाच्या लॅब उभारण्यासाठी आपण अजून काय करायला हवे?



# केळीच्या पानांचा रस पिण्याचे ७ चमत्कारिक फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केळीच्या पानांत नैसर्गिक फायबर व अँटीऑक्सिडंट घटक असतात. यामुळे अपचन, आम्लपित्त, गॅस कमी होतो, आतड्यांची हालचाल सुधारते बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो. शरीरातील विषद्रव बाहेर टाकण्यास मदत करतो, यकृत (लिव्हर) स्वच्छ ठेवण्यास मदत होते, रक्तातील घाण व टॉक्सिन्स बाहेर टाकण्यास सहाय्य, त्वचेवरही



सकारात्मक परिणाम दिसून येतात.

रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त असून, केळीच्या पानांतील पोटॅशियमयुक्त घटक उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात, हृदय निरोगी राहण्यास हातभार लावतात. ताणतणाव कमी करण्यास सहाय्यक ठरतात. नियमित आणि मर्यादित प्रमाणात घेतल्यास रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करतो, इन्सुलिनची कार्यक्षमता सुधारण्यास सहाय्य करतो. केळीच्या पानांत अँटी-बॅक्टेरियल व अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात, सर्दी, खोकला, संसर्गापासून संरक्षण होते, वारंवार आजार पडण्याचे प्रमाण कमी होते. हा रस कॅलरीजमध्ये कमी असल्याने भूक नियंत्रणात राहते, पचन सुधारल्याने चरबी साठणे कमी होते, नैसर्गिक पद्धतीने वजन घटवण्यास मदत होते. केळीच्या पानांचा रस रक्तशुद्धी करून त्वचा उजळण्यास मदत करतो, मुरुम, पुरळ कमी होण्यास सहाय्य करतो, केसगळती कमी करून केस मजबूत बनवतो.

कोवळ्या, स्वच्छ केळीच्या पानांचा रस काढून सकाळी उपाशीपोटी १०-२० मि.ली. रस घ्यावा, आठवड्यातून २ ते ३ वेळा घेतल्यास फायदेशीर ठरतो.

गर्भवती महिला, गंभीर आजार असलेल्यांनी लोकांनी डॉक्टरांचा सल्ला घेऊन रस घ्यावा, अति प्रमाणात सेवन टाळावे, रस काढण्यासाठी नेहमी ताजे व स्वच्छ पान वापरावे.



# तळलेले पदार्थ मऊ का पडतात?

## कुरकुरीत राहण्यासाठी काय उपाय? गृहिणींनो 'या' सोप्या ट्रिक्स वापरून पाहाच

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सायंकाळची वेळ झाली की आपल्याला वेध लागतात ते म्हणजे चहासोबत काहीतरी कुरकुरीत खाण्याचे. मग आपण हौसेने कांदा भजी, बटाटा वडा, चिवडा किंवा मुलांसाठी कुरकुरीत बटाट्याचे वेफर्स तळायला घेतो. एवढच नाही तर जेवणात लागणारे पापड, कुरडई सारखे पदार्थ ही स्वयंपाक घरात बनवितो. कढईतून गरम गरम काढताना तर ते अगदी कडक आणि छान असतात. मात्र, पानात वाढेपर्यंत किंवा डब्यात भरेपर्यंत ते अचानक मऊ पडतात. त्याचा तो कुरकुरीतपणा जातो आणि सगळी मजाच हिरमुसली होते.

आपल्यासारख्या गृहिणींना हे नेहमीच जाणवते, की एवढ्या मेहनतीने तळलेला पदार्थ जर थोड्याच वेळात 'चामट' झाला की घरच्यांच्या चेहऱ्यावरचा आनंदही कमी होतो. कधी पिठाचा अंदाज चुकतो, तर कधी तळण्याची पद्धत. तळलेले पदार्थ हॉटेलसारखे जास्त वेळ कुरकुरीत ठेवण्यासाठी काही खास घरगुती उपाय आपण पाहूया.

### घाईघाईत डबा बंद करण्याची चूक

चिवडा, पापड, भजी किंवा वडे तळले की ते गरम असतानाच लगेच डब्यात भरतो किंवा वरून झाकण ठेवतो. गरम पदार्थामुळे जी वाफ तयार होते, तिचे रूपांतर पाण्यात होते. तो ओलावा पदार्थाला मऊ पाडतो. तळलेला पदार्थ पूर्णपणे थंड होऊ द्या आणि मगच डब्यात भरा. किंवा सुरुवातीला डब्याचे झाकण अर्धे उघडे ठेवा.

### तेल 'कडकडीत' गरम आहे का?

जर तेल पुरेसे गरम नसेल आणि तुम्ही त्यात पदार्थ टाकला, तर तो पदार्थ तेल जास्त शोषतो आणि आतून तेलकट झाल्यामुळे मऊ पडतो. याउलट खूप जास्त कडक तेल असेल तर पदार्थ बाहेरून जळतो आणि आतून कच्चा राहतो. तेल मध्यम गरम असावे. पिठाचा एक छोटा गोळा टाकल्यावर तो लगेच वर आला की समजावे तेल परफेक्ट आहे.

### पिठात 'मोहन' टाकायला विसरू नका

चकली, शंकरपाळी किंवा भजी करताना पिठात थोडे 'मोहन' (गरम तेलाचे मोहन) घालणे खूप महत्त्वाचे असते. जर हे मोहन नसेल किंवा त्याचे प्रमाण चुकले तरी पदार्थ मऊ पडू शकतात. पीठ मळताना त्यात एक-दोन चमचे कडकडीत गरम तेल घाला. यामुळे पदार्थ खुसखुशीत होतो.

कुरकुरीतपणासाठी 'तांदळाचे पीठ' किंवा 'कॉर्नफ्लोअर' फक्त बेसन वापरून भजी केली की ती लवकर मऊ होतात. हॉटेलमध्ये किंवा गाडीवर भजी कुरकुरीत राहण्याचे एक गुपित म्हणजे त्यांचे पीठ. बेसनामध्ये नेहमी थोडे तांदळाचे पीठ किंवा कॉनफ्लोअर मिसळा. यामुळे तळलेला पदार्थ बराच वेळ कडक राहतो.

### कागदावर काढण्याची पद्धत

आपण कढईतून पदार्थ काढला की लगेच प्लेटमध्ये ठेवतो. खालच्या बाजूचे तेल तिथेच साचून राहते आणि खालचा भाग मऊ होतो. तळलेले पदार्थ नेहमी 'जाळीदार' भांड्यात किंवा टिश्यू पेपरवर काढा. जास्तीचे तेल शोषले गेले की पदार्थ कुरकुरीत राहण्यास मदत होते.

### गृहिणींसाठी एक खास 'बोनस' टीप

तुमचे पदार्थ मऊ पडलेच, तर ते पुन्हा तेलात टाकू नका. त्याऐवजी तव्यावर थोडे गरम करा किंवा 'एअर फ्रायर' असल्यास त्यात १- २ मिनिटे ठेवा. ते पुन्हा कुरकुरीत होतील.

### स्वयंपाकात थोड्या चुका तर होणारच

कधी पीठ सैल होईल तर कधी तेल थंड राहील. पण या छोट्या गोष्टी लक्षात ठेवल्या तर तुमच्या हातची भजी आणि चकली घरातले सगळे अगदी चवीने आणि कुरकुर आवाज करत खातील.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# परग्रहवासीयांशी संपर्क, सोन्याचे दर उतरणार, तिसरे महायुद्धही होणार!

## २०२६ मध्ये भयंकर घटना घडण्याची भाकिते


**ग्लोबल महातेज**

बल्गेरियन बाबा वेंगा यांच्याबद्दल पुन्हा एकदा जोरदार ऑनलाइन चर्चा सुरू झाली आहे. सोशल मीडिया पोस्ट आणि असंख्य ऑनलाइन बातम्यांमध्ये दावा करण्यात आला आहे की, बाबा वेंगा यांनी २०२६ साठी अनेक मोठ्या जागतिक घटनांची भविष्यवाणी केली होती. यापैकी बहुतेक दाव्यांचे ठोस पुरावे नसले तरी, ही भाकिते लोकांमध्ये उत्सुकता आणि चिंता दोन्ही निर्माण करत आहेत.
सोशल मीडियावर फिरणाऱ्या पोस्टमध्ये दावा केला जात आहे, की बाबा वेंगा यांनी २०२६ मध्ये एका

या संघर्षामुळे अनेक खंडांवर परिणाम होऊ शकतात आणि जगातील मोठ्या आंतरराष्ट्रीय संघर्षाची भविष्यवाणी केली होती. प्रमुख शक्तींमध्ये लक्षणीय तणाव निर्माण होऊ शकतो. बाबा वेंगा यांच्या भाकिताचा इशारा तिसऱ्या महायुद्धाकडे असल्याचा दावा केला जात आहे. बाबा वेंगा यांनी २०२६ मध्ये पर्यावरणीय संकटाचा इशाराही दिला आहे. २०२६ मध्ये जगभरात भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, इतर नैसर्गिक आपत्ती येतील, असे त्यांचे भाकीत असल्याचे म्हटले जात आहे.
मोठे अंतराळयान पृथ्वीच्या जवळ येईल सोशल मीडियावरील पोस्ट बाबा वेंगा यांच्या भाकिताचा आधार घेत दावा करत आहेत, की २०२६ मध्ये, मानव पहिल्यांदाच एखाद्या एलियन (परग्रहावरील जीव) संस्कृतीशी संपर्क साधू शकतो, तसेच एक मोठे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणाजवळ येईल. २०२६ मध्ये, रशियामधून एक अत्यंत प्रभावशाली नेता उदयास येईल, ज्याचा जागतिक स्तरावर बोलबाला राहील. २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठ्या गोंधळाचा सामना करावा लागेल. चलन बाजारातील घसरण, बँकींग क्षेत्रावर संकट व महागाईत वाढीसारखी स्थिती उद्भवू शकते.

### कोण होत्या बाबा वेंगा ?

बाबा वेंगा या भविष्यवेत्त्या महिलेचा जन्म १९११ मध्ये स्टुमिका, सध्याच्या येथे झाला. वयाच्या उत्तर मॅसेडोनिया बाराव्या वर्षी त्यांनी आपली दृष्टी गमावली, जी त्यांचे अनुयायी एक दैवी अनुभव आणि त्यांच्या भविष्यसूचक शक्तीची सुरुवात मानतात. १९७० व १९८० च्या दशकात त्यांची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पसरू लागली. घरगुती समस्यांपासून ते जागतिक समस्यांपर्यंत प्रत्येक गोष्टीवर लोक त्यांचा सल्ला घेत होते. १९९६ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले



## पृथ्वीवरील सर्वात चमकदार धातू चांदी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चांदी हा पृथ्वीतील एक सुंदर, चमकदार आणि उपयुक्त धातू आहे. चांदीचा रंग पांढरा चमकदार असतो. ती आणि लवचीक असते. प्राचीन काळापासून लोक चांदीचा वापर दागिने, नाणी, घरगुती वस्तू आणि पूजा-सामग्री बनवण्यासाठी करत आले आहेत. चांदी पृथ्वीच्या खोल थरांमधील खडकांमध्ये मिळते. ती अनेक वेळा तांबे, शिसे आणि जस्त यांच्यासोबत मिसळलेली असते. अनेक नद्यांच्या वाळूतही चांदीचे छोटे चमकदार कण आढळून येतात.

चांदी शोधण्यासाठी भूवैज्ञानिक आधी जमिनीचा अभ्यास करतात. मग खडकांमध्ये कुठे चांदी मिसळलेली आहे ते ठरवल्यावर खाणकाम करणारे कामगार मोठ्या मशीनने खडक तोडतात. या तुटलेल्या दगडांमध्ये चांदीचे कण असतात. त्यांना बाहेर काढून त्या खडकांचे छोटे तुकडे करतात. त्यानंतर हे तुकडे आणखी बारीक करून एकसारखी पूड तयार केली जाते. ही पूड पाण्यात मिसळून एक द्रव मिश्रण बनवले जाते. चांदी जड असल्यामुळे ती खाली बसते.

चांदी अजून शुद्ध करण्यासाठी तिला खूप उष्ण तापमानावर गरम केले जाते. गरम केल्यावर इतर धातू वितळतात आणि हलकी चांदी वर तरंगते. वरची चांदी वेगळी केली जाते आणि थंड करून त्यापासून छोट्या छोट्या पट्ट्या, बार किंवा दागिने बनवण्यासाठी लगडी बनवल्या जातात. ही चांदी अजून शुद्ध करण्यासाठी पुन्हा गरम करणे आणि अशुद्धता वेगळ्या करणे असे काही टप्पे करावे लागतात. शुद्ध चांदीची चमक खूपच तेजस्वी असते. चांदी काळी पडू नये म्हणून तिच्यावर खास थर दिला जातो. राजस्थान, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक या भागांत चांदी जास्त मिळते. विशेषतः जिथे शिसे आणि जस्त हे धातू मिळतात तिथे चांदीही मोठ्या प्रमाणात मिळते. चांदी मौल्यवान आहे, कारण ती कमी प्रमाणात मिळते. विशेष म्हणजे चांदीचा उपयोग दागिने, सजावटीच्या वस्तू, औषधनिर्मिती आणि विज्ञान यांसारख्या अनेक क्षेत्रांत होतो. त्यामुळे सोन्याप्रमाणेच चांदीही अत्यंत महत्त्वाचा आणि महाग धातू आहे.

## ८६ टक्के भारतीयांसाठी दागिने हीच सर्वात महत्त्वाची संपत्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील जवळजवळ ८६ टक्के लोक सोने आणि दागिने हेच संपत्ती निर्मितीचे चांगले साधन मानतात. विशेष म्हणजे संपत्ती निर्मितीचा हा पर्याय म्युच्युअल फंड आणि समभाग यांसारख्या भांडवल बाजाराशी संबंधित गुंतवणूक पर्यायांच्या जवळपास आहे. हा पर्याय जवळपास ८७ टक्के लोक पसंत करतात. त्यामुळे आजही दागिन्यांचे महत्त्व यावरून स्पष्ट होते. देशातील दागिने बाजार वेगाने बदलत आहे. लोक आता दागिन्यांना केवळ लग्न किंवा परंपरांशी जोडत नाहीत, तर ते त्यांच्या ओळखीचा, जीवनशैलीचा भाग आहे.



**असा आहे दागिने खरेदीचा कल**


■ पुरुष आणि ४५ वर्षपिक्षा जास्त वयाचे लोक गुतवणूक म्हणून खरेदी.
■ तरुणाई स्टाईल, कस्टमायझेशन **डिझाइन आणि विविध प्रकारे परिधानाच्या सुविधेला प्राधान्य**
■ जुन्या आणि तरुण पिढ्या हलक्या, रोजच्या वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या दागिन्यांचा वापर वाढत्या प्रमाणात करत आहेत.
■ सुमारे ४९ टक्के लोकांची जड, अलंकृत दागिन्यापेक्षा हलके, कमी दर्जाच्या दागिन्यांना पसंती.

फक्त लग्नसराईसाठी खरेदीचे समीकरण बदलले पूर्वी भारतात अंदाजे ७० टक्के दागिने लग्नासाठी खरेदी केले जात होते. मात्र, हे समीकरण बदलत आहे.
तरुण वाढदिवस आणि वर्धापन दिन (३८ टक्के), दैनंदिन आणि ऑफिस पोशाख (३२ टक्के) आणि करिअरमधील कामगिरी जसे की पदोन्नती ४९ टक्के लोक पारंपरिक जड आणि शैक्षणिक कामगिरीसाठी दागिने खरेदी करतात. दागिन्यांपेक्षा वैयक्तिक आणि गैरधार्मिक प्रसंगी अंगठ्या, चेन आणि कानातले यांसारखे दागिने पसंत करतात, असे अहवालात म्हटले आहे.

## पृथ्वीवरील सर्वात मौल्यवान धातू सोने

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोने हा पृथ्वीवरील सर्वांत सुंदर आणि मौल्यवान धातू मानला जातो. त्याचा रंग पिवळसर आणि चमकदार असतो. सोने पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या अनेक मीटर खाली आढळते. सोने जमिनीतून काढण्यासाठी आधी खडक फोडावे लागतात. त्या खडकात सोन्याचे अगदी छोटे कण असतात. खडकाची पावडर करून त्यावर पाणी सोडतात. सोने जड असल्यामुळे खाली बसते. याला 'पॅनिंग' किंवा धुण्याची पद्धत म्हणतात. मोठ्या खाणींमध्ये मशीनने खडक वेगळे करतात आणि रसायनांच्या मदतीने सोन्याचे कण वेगळे केले जातात. मिळालेले सोने पूर्ण शुद्ध नसते. त्यात चांदीसह अनेक इतर धातू मिसळलेले असतात. मिलमध्ये मोठे खडक आधी चिरडले जातात आणि नंतर पुन्हा पुन्हा फोडून बारीक पूड केली जाते. त्यात पाणी आणि सायनाइड मिसळून त्याचे एक पातळ मिश्रण तयार केले जाते. हे मिश्रण मोठ टाक्यांमध्ये सोडले जाते. या चिखलातील जड कण खाली बसतात लोच १३६ आणि द्रवापासून वेगळे केले जातात. ही द्रव सामग्री बाहेर काढली जाते आणि फिरणाऱ्या दंडगोलाकार ड्रमवर सोडली जाते. मिश्रण पसरून हळूहळू बाष्पीभवन होते. त्यानंतर रसायनांच्या मदतीने अशुद्धता काढली जाते. शुद्ध सोने मिळवण्यासाठी तापवावे लागते. या सगळ्या प्रक्रियेनंतर उरलेला चमकदार धातू म्हणजे सोने. त्यापासून बार, नाणे किंवा दागिने बनवण्यात येतात. चांगल्या सोन्याच्या खाणीमधल्या १ हजार किलो खडकाच्या पावडरमधून साधारण ६. ५ ग्रॅम सोने मिळू शकते. भारतामध्ये सोने प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, झारखंड आणि राजस्थान या ठिकाणी मिळते. कर्नाटकातील कोलारमध्ये सध्या उत्खनन थांबले आहे. तसेच हिमालयाच्या काही भागातील नद्यांमध्येही सोन्याचे लहान कण आढळतात. सोने खूप टिकाऊ असते. हवा, पाणी किंवा वेळ यामुळे त्याला गंज किंवा डाग लागत नाहीत.



अमळनेर : लोकमान्य विद्यालयात बुधवारी बालआनंद मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. दीपाली साळुंखे, नगरसेविका रूपाली शिवदे, सौ. वसुंधराताई लांडगे, प्रा. डी. डी. पाटील, विवेकानंद भांडारकर आदी.

## लोकमान्य विद्यालयात बालआनंद मेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील लोकमान्य शिक्षण मंडळ संचलित बाल विकास मंदिर, नवीन मराठी शाळा व लोकमान्य विद्यालयातर्फे बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी बालआनंद मेळावा उत्साहात झाला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांचे मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले.

लोकमान्य शिक्षण मंडळाचे चिटणीस विवेकानंद भांडारकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. दीपाली साळुंखे, नगरसेविका रूपाली शिवदे, खानदेश शिक्षण मंडळाच्या विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, संस्थेचे अध्यक्ष प्रा. डी. डी. पाटील, लोकमान्य विद्यालयाचे शाळा समितीचे चेअरमन प्रा. डॉ. पी. जे. जोशी, नवीन मराठी शाळेचे मुख्याध्यापक अतुल भोई, लोकमान्य विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. के. चौधरी, बाल विकास मंदिराच्या मुख्याध्यापिका अनिता वैद्य आदी व्यासपीठावर उपस्थित होते. आनंदमेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व मनोरंजक स्टॉल्स उभारले होते. या स्टॉल्सद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे, कौशल्याचे व सर्जनशीलतेचे प्रभावी दर्शन घडविले. पालकांनी स्टॉल्सला भेटी देवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

जितेंद्र बेडसे, राहुल सरदार व किशोर बडगुजर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अर्चना वाघ यांनी सूत्रसंचालन केले.

## हात धुण्यासाठी सतत हॅन्डवॉश वापरताय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वच्छतेसाठी हात धुणे गरजेचे असले तरी, सतत हॅन्डवॉश वापरल्याने त्वचेच्या नैसर्गिक तेलावर परिणाम होऊ शकतो. कशी घ्यावी काळजी जाणून घ्या.
**त्वचा कोरडी पडण्याची भीती** : हॅन्डवॉशमधील रसायनांमुळे हातांची त्वचा कोरडी आणि खडबडीत होऊ शकते. ज्यामुळे खाज सुटण्याची शक्यता असते.
**त्वचेची जळजळ आणि रॅशेस** : जास्त प्रमाणात फेस येणाऱ्या उत्पादनांमुळे काहींना त्वचेवर लाल रॅशेस किंवा जळजळ जाणवू शकते. **नैसर्गिक बॅक्टेरिया नष्ट होतात** : सततच्या वापरामुळे हातांवरील 'चांगले बॅक्टेरिया' देखील नष्ट होतात, जे आपल्या त्वचेच्या संरक्षणासाठी महत्त्वाचे असतात.
**हॅन्डवॉशमधील रसायने तपासा** : तुमच्या हॅन्डवॉशमध्ये 'ट्रायक्लोसन' किंवा 'पॅराबेन्स' सारखी घातक रसायने तर नाहीत ना? याची नक्की खात्री करा.
**मॉइश्चरायझरचा वापर करा** : हात धुतल्यानंतर त्वचा कोरडी होऊ नये म्हणून सौम्य मॉइश्चरायझर किंवा हँड क्रीम लावणे विसरू नका.
नैसर्गिक पर्यायांचा विचार करा : शक्य असल्यास केमिकलमुक्त किंवा हर्बल हॅन्डवॉशचा वापर करा, ज्यामुळे त्वचेचे नुकसान कमी होईल.
योग्य पद्धत फॉलो करा : प्रत्येक ५ मिनिटांनी हात धुण्यापेक्षा, जेवणापूर्वी किंवा बाहेरून आल्यावरच हात धुवावेत.




अमळनेर : संजय पाटील यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी. शेजारी उपस्थित मान्यवर.

## साने गुरुजी शिक्षक साहित्य संघाचे संजय पाटील राज्याध्यक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खान्देश साहित्य संघ संचलित साने गुरुजी शिक्षक साहित्य संघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी संजय कृष्णा पाटील यांची निवड करण्यात आली आहे. येथील प्रताप महाविद्यालयाच्या गांधी अध्ययन येथे झालेल्या बैठकीत खान्देश साहित्य संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी ही निवड जाहीर केली आहे.

यावेळी महिला आघाडीच्या अध्यक्षा रत्नाताई पाटील, जिल्हाध्यक्ष शरद धनगर, शाहीर नाना पाटील, मराठी विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर कांबळे, साहित्यिक गोकूळ बागूल, तालुकाध्यक्ष उमेश काटे उपस्थित होते.
यावेळी प्रा. डॉ. सूर्यवंशी म्हणाले, की अमळनेर ही साहित्य संस्कृतीची भूमी आहे. साहित्य चळवळ टिकवणे गरजेचे आहे. नव्या पिढीला व्यासपीठ उपलब्ध करताना त्यांच्यात साहित्याची आवड निर्माण करणे देखील आवश्यक आहे. खान्देशी साहित्य चळवळ मजबूत करण्यासाठी संघाच्या विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. जिल्हा कार्यवाह म्हणून गोकुळ बागुल, कवयित्री बहिणाबाई साहित्य संघाच्या राज्य संघटन प्रमुख म्हणून छाया इसे, जळगाव जिल्हा संघटक डॉ. सुवर्णा पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख रेखा मराठे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सीमा संदेश पाटील, तालुका कार्यवाह नूतन पाटील, तालुका मार्गदर्शक मुख्याध्यापिका अनिता बोरसे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य ज्ञानेश्री पाटील, अशोक पाटील, मनोज ठाकरे, विलास बिरारी, मार्गदर्शक भाऊसाहेब देशमुख यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. खान्देशात पुढील साहित्य संमेलन, मराठी आणि अहिराणी भाषा यांचे महत्व वाढवण्यासाठी विविध साहित्यिक उपक्रम राबवणे याविषयावर चर्चा करण्यात आली. उमेश काटे व गोपाल हडपे यांनी सूत्रसंचालन केले. डी. ए. धनगर यांनी आभार मानले.

## रशियात हिमवादळामुळे अख्खे शहर बर्फाखाली !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सहसा 'हिमवादळ' हा शब्द ऐकल्यावर किंवा वाचल्यानंतर यामध्ये वादळाचा असणारा उल्लेख पाहता त्याची तीव्रता लक्षात येते. मात्र, प्रत्यक्षात हे हिमवादळ कोणत्या स्वरूपातील असते आणि ते धडकल्यास नेमकी काय स्थिती उद्भवते याची प्रचिती नुकतीच संपूर्ण जगाला आली आहे. रशियात हिमवादळामुळे अख्खेच्या अख्खे शहरच बर्फाखाली दबल्याचे पाहायला मिळाले आहे. रशियाच्या अतिपूर्वेला असणाऱ्या कामचटका पेनिन्स्युला इथे शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी हे अतिप्रचंड हिमवादळ धडकले. ज्यातून हे शहर अद्यापही सावरू शकलेले नाही. तज्ज्ञांच्या माहितीनुसार गेल्या ६० वर्षांमधील ही सर्वाधिक हिमवृष्टी आहे. शहरातील बहुतांश भागांमध्ये सोळा फूट बर्फाचे थरच्या थर जमल्याचे पाहायला मिळाले. ज्यामुळे काही इमारतींचे बाहेर येण्याचे मार्ग बंद झाले असून, नागरिक आहेत तिथेच अडकले आहेत. घराबाहेर पडण्यासाठी अनेक नागरिकांना खोदकाम करत जमलेल्या बर्फाच्या ढिगाऱ्यातून वाट काढावी लागली. अनेकांची वाहने या ढिगाऱ्याखाली अडकली. निसर्गाने हे रौद्ररूप धारण केलेले असतानाच वादळ शांत झाल्यानंतर बर्फाच्या या ढिगाऱ्याकडे एक संकट म्हणून न पाहता नागरिकांनी यातूनही एक वाट काढली. कामचटका इथे डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या हिमवर्षावाच्या तुलनेत तिप्पट अधिक हिमवर्षाव जानेवारीत झाल्यामुळे हिमवादळाची कधीही न पाहिलेली भीषणता नागरिकांनी अनुभवली. काहींनी या बर्फाच्या ढिगाऱ्यावर चक्क घसरगुंडीचाही आनंद घेतला. शहरातील अनेक रस्ते बर्फामुळे



बंद असताना आणि बाजारहाट किंवा तत्सम गोष्टींसाठी कोणताही वाव नसताना नागरिकांनी आपलाच विरंगुळा म्हणून या बर्फाच्छादित भागातही आनंदाच्या वेगळ्या वाटा निवडल्या आहेत.

प्राथमिक माहितीनुसार ७० च्या दशकानंतर झालेली ही सर्वात मोठी हिमवृष्टी आहे. यामध्ये काही दुर्घटनांची नोंदही करण्यात आली आहे. जिथे दोन नागरिकांचा मृत्यू छतावरील बर्फ पडून झाला आहे. ही परिस्थिती भीषण असून, प्रशासनाने आणीबाणीसुद्धा घोषित केली आहे. कामचटका आणि नजीकच्या भागातील शाळा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, हवाई प्रवास ठप्प झाला असून, यातून सावरण्यासाठी आणखी काही दिवस जाणार असल्याचे स्पष्ट होत आहे. कामचटका हे ठिकाण पॅसिफिक महासागर आणि ओखोत्साक समुद्रादरम्यान आहे. येथील भौगोलिक स्थिती आणि हवामानाची एकंदर स्थिती पाहता हिमवृष्टीसाठी येथे अतिशय पूरक वातावरण आहे. येणाऱ्या चक्रीवादळामुळे हवामानातील दमटपणा वाढतो आणि थंड वाऱ्यांशी एकरूप होऊन इथे हिमवर्षाव होतो. कामचटका येथील पर्वत आणि ज्वालामुखी यामुळे दमट हवा पर्वतांशी आदळून उंचावर जाते आणि थंड वाऱ्यामुळे या दमटपणाचे बर्फात रूपांतर होते.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे







# वसंत पंचमीचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आध्यात्मिक दृष्टिकोनातून वसंत पंचमी हा दिवस अत्यंत सत्त्वप्रधान मानला जातो. या दिवशी पृथ्वीवर चैतन्याचे प्रमाण वाढते व साधनेस पोषक वातावरण निर्माण होते.

### वसंत पंचमीचे आध्यात्मिक महत्त्व

* **सरस्वती तत्त्व सक्रिय होते.**
  वसंत पंचमीला सरस्वती देवीचे तत्त्व अधिक प्रमाणात कार्यरत असते. विद्या, बुद्धी, स्मरणशक्ती, विवेक वाढीस मदत होते.
* **सत्त्वगुण वाढवणारा दिवस**
  रज-तम गुणांपेक्षा सत्त्वगुण जास्त कार्यरत असल्यामुळे साधना, जप, ध्यान यांचा लाभ अनेकपटीने मिळतो.
* **नवीन विद्यारंभासाठी योग्य दिवस**
  अक्षरारंभ, ग्रंथपूजन, वाचन-लेखन सुरू करण्यास हा दिवस श्रेष्ठ मानला जातो.
* **निसर्गातील चैतन्य वाढते**
  वसंत ऋतूमुळे निसर्गात सौंदर्य, प्रसन्नता व उत्साह निर्माण



होतो.
याचा सकारात्मक परिणाम मन व बुद्धीवर होतो.
* **देवतेची कृपा सहज मिळते**

या दिवशी भगवंताचे व देवतांचे तत्त्व अधिक प्रमाणात पृथ्वीवर अवतरते, त्यामुळे नामस्मरण व उपासना लवकर फलदायी ठरते.

### काय करावे? (सनातन पद्धतीनुसार)

* सकाळी लवकर उठून स्नान व देवपूजन करावे
* सरस्वती देवीचा जप 'ॐ ऐं सरस्वत्यै नमः'
* शक्य असल्यास पिवळे/साधे वस्त्र परिधान करावे
* सात्त्विक आहार घ्यावा
* जास्तीत जास्त नामस्मरण व साधना करावी

### काय टाळावे?

* तमसिक आहार, मद्यपान, मांसाहार
अनावश्यक करमणूक, वाद-विवाद
* वसंत पंचमी हा ज्ञान, चैतन्य व साधनेस अनुकूल असा दिवस असून, सनातन संस्थेनुसार या दिवशी केलेली साधना अधिक प्रभावी व फलदायी ठरते.
* हवे असल्यास मी लहान सुविचार, प्रवचनासाठी मुद्दे किंवा पूजा विधी देखील देऊ शकतो.

# वसंत पंचमीला तयार होतोय विष योग!

## नाती, नोकरी, पैसा... 'या' ३ राशींना प्रत्येक गोष्ट जपावी लागणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कॅलेंडरनुसार वसंत पंचमी माघ महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पंचमी तिथीला येते. यावर्षी वसंत पंचमी २३ जानेवारी २०२६ रोजी साजरी झाली. शास्त्रांनुसार ही तिथी ज्ञानाची देवता देवी सरस्वतीला समर्पित असते. या दिवशी देवीची पूजा केल्याने भक्ताची कला आणि कौशल्य वाढते आणि करिअरमध्ये यश मिळण्याची शक्यता निर्माण होते. तसेच वसंत पंचमी ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून आणखी महत्त्वाची ठरेल. परीघ योग जुळून येईल आणि भाद्रपदा नक्षत्र जागृत असेल. अभिजित मुहूर्त १२ वाजून १० मिनिटांनी सुरू होऊन ते १२ वाजून ५२ मिनिटांपर्यंत होते. त्याचबरोबर आज रानी आणि चंद्र मीन राशीत युती करतील. ज्यामुळे 'विष योग' निर्माण झाला आहे. या योगामुळे काही राशींच्या समस्या वाढू शकतात. तर या राशींची नावे जाणून घेऊया.

**वृषभ**

वृषभ रस असणाऱ्या मंडळींच्या नोकरीत समस्या वाढू शकतात. त्यामुळे कामाच्या ठिकाणी सावधगिरी बाळगावी लागणार आहे. या काळात त्यांना आर्थिक समस्यांनाही तोंड द्यावे लागू शकते. तुमच्या जोडीदाराबरोबर नाते सांभाळणे सुद्धा कठीण जाऊ शकते.

**सिंह**

तुम्ही नोकरी बदलण्याचा विचार करू शकता. या काळात दिखावा करणे टाळा. तुमच्या कामातील अडथळे तुम्हाला त्रास देतील आणि नवीन लोकांशी तुमचे काही मतभेद होऊ शकतात. सध्या गुंतवणूक करण्यापासून दूर राहणे चांगले. जुन्या समस्यांचे मनावर ओझे वाटेल; ज्यामुळे ताण निर्माण होईल.

**वृश्चिक**

हा काळ तुमच्यासाठी अडचणींनी भरलेला असणार आहे. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे. कुटुंब आणि प्रेम संबंधातील गोष्टी संयमाने सोडवा. अचानक मोठे खर्च येऊ शकतात; ज्यामुळे तुमचे बजेट बिघडू शकते. याव्यतिरिक्त, प्रेमसंबंधात समस्या उद्भवू शकतात.

**तर पुढील राशींसाठी आजचा दिवस खास असणार**

**तूळ** – आज तुमच्या राशीला चांगला आर्थिक लाभ होईल. तुमचा मान वाढेल. सामाजिक कामात रस घ्याल. मौल्यावान वस्तू खरेदी कराल आणि कष्टावर अधिक भर देण्याचा प्रयत्न कराल.

**मीन** – कामाचा उरक वाढेल. हातात काही अधिकार येतील. कार्यपद्धतीत बदल कराल. मुलांना कामात मदत कराल. सकारात्मक विचार करावेत.

**मेष** – प्रेमसंबंध सुधारतील. करमणुकीवर भर द्याल. सर्वांशी आनंदाने वागाल. घरातील कामाची दगदग जाणवेल. जवळचे नातेवाईक भेटतील.

# युट्यूबवर ५ अब्ज दर्शकसंख्या ओलांडणारा भारतातील पहिला व्हिडिओ

## 'श्री हनुमान चालिसा'ची हनुमान उडी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : युट्यूबवरील एका भक्ती व्हिडिओने असे साध्य केले आहे, की जे भारतात कोणत्याही बॉलिवूड गाण्याने, पंजाबी चार्ट-टॉपरने किंवा व्हायरल डान्स नंबरने साध्य केले नाही. १० मे २०११ रोजी युट्यूबवर अपलोड केलेल्या टी-सिरीजच्या श्री हनुमान चालिसा व्हिडिओने ५ अब्ज दर्शकसंख्या (व्ह्यूज) ओलांडली आहे. ही कामगिरी करणारा देशातील तो पहिला व्हिडिओ बनला आहे.

चौदा वर्षांनंतरही हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. हरिहरन यांनी गायिलेला आणि ललित सेन यांनी संगीतबद्ध केलेला हा व्हिडिओ गुलशन कुमार यांच्यावर चित्रित केलेला आहे.

बदलते डिजिटल जग, लघू व्हिडिओ मंच आणि नवीन पॉप ट्रेंड असूनही या भक्ती व्हिडिओला सातत्याने दर्शक मिळत आहेत. त्यानंतर लेहेंगा, ५२ गज का दमन, राउडी बेबी, जरुरी था, वास्ते, लौंग लाची, लूट गये आणि दिलबर सारखी गाणी आहेत. त्यापैकी एकालाही दोन अब्जांपेक्षा जास्त दर्शक मिळालेले नाहीत.

**युट्यूबवर सर्वाधिक पाहिले गेलेले व्हिडिओ**

| टॉप ५ जग | | टॉप ५ भारत | |
|---|---|---|---|
| (दर्शकसंख्या अब्जांमध्ये) | | | |
| बेबी शार्क डान्स | १६.३८ | श्री हनुमान चालिसा | ५ |
| डेस्पॅसिटो | ८.८५ | लहेंगा | १.८२ |
| व्हील्स ऑन द बस | ७.४० | ५२ गज का दामन | १.७३ |
| बाथ सॉन्ग | ७.२० | राऊडी बेबी | १.७२ |
| जॉनी जॉनी येस पापा | ७.१० | जरूरी था | १.७१ |

**तुलसीदास यांची रचना :**

हनुमान चालिसा ही गोस्वामी तुलसीदासांनी रचलेली ४० चौपायांची (चार ओळींचे श्लोक) प्रभू हनुमान यांची स्तुती आहे. त्यांची शक्ती, भक्ती आणि विवेकाचे वर्णन यात आढळते. संकटांपासून संरक्षण, मानसिक स्थैर्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी हनुमान चालिसाचे पठण केले जाते.

# देवी सरस्वतीच्या या आहेत फेव्हरेट राशी

## जीवनात होते प्रगती व कायम मिळते बुद्धी, यश आणि ज्ञान..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवी सरस्वतीला ज्ञानाची देवी मानले जाते. अशी मान्यता आहे, की देवी सरस्वतीची पूजा केल्याने व्यक्तीच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पसरतो आणि खूप मान-सन्मान मिळतो. ज्योतिषशास्त्रानुसार देवी सरस्वतीच्या काही प्रिय राशी आहेत ज्यांच्यावर देवी सरस्वतीची नेहमी विशेष कृपा राहते. यामुळे या राशींचा आध्यात्मिक आणि कलात्मक क्षेत्रांकडे अधिक कल असतो. चला तर मग जाणून घेऊया देवी सरस्वतीच्या प्रिय राशी कोणत्या आहेत.

**देवी सरस्वतीची प्रिय राशी : वृषभ**



ज्योतिषशास्त्रानुसार वृषभ राशीचा स्वामी शुक्र ग्रह आहे. वृषभ राशीचे लोक कलाप्रेमी आणि क्रिएटिव्ह असतात. तसेच, त्यांच्यामध्ये नेतृत्व क्षमताही खूप चांगली असते, ज्यामुळे ही राशी देवी सरस्वतीला खूप प्रिय आहे. देवी सरस्वतीच्या कृपेमुळे या राशीचे लोक बुद्धी आणि शिक्षणाच्या बाबतीत खूप हुशार असतात.

**देवी सरस्वतीची प्रिय राशी : मिथुन**



मिथुन राशीचा स्वामी बुध ग्रह आहे. बुध ग्रह बुद्धी, तर्क, वाणी आणि संवादाचा कारक आहे. देवी सरस्वती विद्या, ज्ञान आणि बुद्धीची देवी आहे. तसेच, बुध ग्रह वाणी आणि बुद्धीचा कारक ग्रह असल्याने, मिथुन राशीच्या लोकांवरही देवी सरस्वतीची विशेष कृपा राहते. मिथुन राशीचे लोक ज्ञान मिळवण्यासाठी नेहमीच उत्सुक असतात.

**देवी सरस्वतीची प्रिय राशी : कन्या**



कन्या राशीचा स्वामी देखील बुध ग्रह आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, बुध ग्रहाच्या प्रभावामुळे कन्या राशीच्या लोकांमध्ये कोणतीही नवीन गोष्ट शिकण्याची इच्छा नेहमीच टिकून राहते. या गुणधर्मामुळे देवी सरस्वतीला कन्या राशी प्रिय आहे.

**देवी सरस्वतीची प्रिय राशी : तुळ**



ज्योतिषशास्त्रानुसार तुळ राशी देखील देवी सरस्वतीच्या प्रिय राशींपैकी एक आहे. याचे कारण म्हणजे तुळ राशीचा स्वामी शुक्र ग्रह आहे. तुळ राशीचे लोक कला आणि संगीताचे प्रेमी असतात. देवी सरस्वती देखील संगीताची देवी असल्याने देवी सरस्वतीची या राशीच्या लोकांवर विशेष कृपा राहते.

**देवी सरस्वतीची प्रिय राशी : मीन**




ज्योतिषशास्त्रानुसार मीन राशीचा स्वामी देखील गुरु ग्रह आहे. गुरू ग्रहामुळे मीन राशीच्या लोकांचा स्वभाव अध्यात्मिकतेकडे अधिक झुकलेला असतो. याच कारणामुळे देवी सरस्वतीची विशेष कृपा मीन राशीच्या लोकांवर राहते. देवी सरस्वतीच्या कृपेमुळे या राशीचे लोक सहजपणे ज्ञान प्राप्त करतात.

# नाम घेण्याला काहीही आड येत नाही...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण असे पाहू, की नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून कोणत्याही तऱ्हेच्या शंका-कुशंका न घेता, कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही.



जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, 'देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो.' प्रल्हाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले? तेच आपण मागावे आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. 'देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर.' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंतःकरणात समाधान ठेवावे. जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.

# वसंत पंचमीच्या निमित्ताने...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



वसंत पंचमी ही शिशिर ऋतूमध्ये येणारी माघ शुद्ध पंचमी होय. वसंत पंचमीलाच श्रीपंचमी किंवा ज्ञानपंचमी म्हणतात. वसंत ऋतूला ऋतूंचा राजा असे मानले जाते. त्याचे स्वागत करण्याचा हा विशेष दिवस आहे.
भारतात साधारणतः मकर संक्रांतीनंतर (खरेतर २१ डिसेंबरनंतर) सूर्याचे उत्तरायण सुरू होतानाच्या काळात येणारा हा सण आहे. भारतात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होत असला, तरी खास करून या दिवशी, नृत्यादि कला शिकवणाऱ्या संस्थांत, विद्येची देवता – सरस्वतीची पूजा करण्याची प्रथा आहे. वसंत पंचमीपासून वसंत ऋतू सुरू झाला असे समजले जाते. हा दिवस सरस्वतीचा जन्मदिवस आहे.वसंत पंचमी ही कामदेवाच्या पूजेसाठीही ओळखली जात असे. सुफी परंपरेतील चिश्ती संप्रदायात हजरत निजामुद्दीन अवलियाचे शागीर्द मोहरीच्या पिवळ्या फुलांच्या रंगात बुडविलेली वस्त्रे नेसून हा सण साजरा करतात. मध्ययुगात या दिवशी 'सुवसंतक' नावाचा उत्सव होत असे.

### देवी सरस्वती जयंती

हा दिवस देवी सरस्वतीचा जन्मदिवस म्हणूनही साजरा केला जातो. एकदा फिरत असताना सृष्टी निर्माता ब्रह्मदेव यांना अवतीभवती शांतात वाटू लागली. त्यामुळे येथे काही कमतरता आहे ,असे वाटून त्यांच्या मुखातून वीणावादन करीत देवी सरस्वती प्रकट झाली, अशी कथा प्रचलित आहे.

### नैवेद्याचे पदार्थ

वसंत पंचमीच्या दिवशी सरस्वती देवीला नैवेद्य दाखविण्यासाठी भारताच्या विविध प्रांतात बुंदीचे लाडू, नारळाची बर्फी, खिचडी, केशरी राजभोग, विविध प्रकारची भजी असे पदार्थ केले जातात आणि त्याचा प्रसाद म्हणून स्वीकार केला जातो.

# सकारात्मक विचारांचे सामर्थ्य...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपले संपूर्ण आयुष्य हे आपण कसा विचार करतो? यावर सर्वस्वी अवलंबून आहे. मनात दररोज (२४ तासांत) ६० हजार विचार येतात. यातील ६० ते ७० टक्के विचार हे नकारात्मक असतात. दर १५ ते २० सेकंदाला नवीन विचार हे चक्र अव्ह्याहतपणे चालू असते.

ज्यावेळेस आपण नकारात्मक विचार करतो त्यावेळेस विश्वात जेवढी नकारात्मक तरंग आहेत त्याच्याशी आपण जोडले जाऊन नकारात्मक विचारांची गर्दी आपल्याभोवती उरते व उदासी, भय यातून नैराश्याकडे वाटचाल सुरू होते. रेडिओ किंवा वाहिन्या ज्या ब्रँडवर आपण लावतो तेच प्रक्षेपण लगेच चालू होते. म्हणून नकारात्मक विचारांना सकारात्मक करणे गरजेचे असते. सकारात्मक विचार आपली शक्ती आत्मविश्वास, मनोबल वाढवितात.

नकारात्मक विचारांना सकारात्मक करणे म्हणजे मनाचेचे, मनाशी युद्ध करणे होय. यालाच तुकाराम महाराज म्हणतात...''रात्रं दिनं आम्हां युद्धाचा प्रसंग''!

थॉमस् अल्वा एडिसनने ९९९ प्रयोग केले. हजाराव्या प्रयोगाच्या वेळेला विजेचा दिवा लागला. थॉमसला ज्यावेळेस पत्रकारांनी मुलाखतीत विचारले तेव्हा थॉमस ९९९ प्रमाणे फसले. याबाबत तुला काय वाटले?

थॉमस म्हणाला, की ९९९ प्रयोग फसले असे म्हणू नका. ९९९ वेळा मी हे सिद्ध केले, या मार्गाने विजेचा दिवा लागू शकत नाही. (सकारात्मक दृष्टिकोन) नेपोलियन समुद्र किनाऱ्यावर सैन्यासमोर जहाजातून उतरताना पाय चिखलावर घसरून छातीवर आडवा पडला, छाती चिखलाने माखली. तेव्हा अंधश्रद्धाळू सैनिकांना वाटले, की आपला सेनापती आडवा झाला म्हणजे आज आपला पराभव होणार, आपली मुंडकी उडणार. सैनिक भयभत झाले. नेपोलियनने ही बाब हेरली. तो उठताना छातीत झटकत म्हणाला, 'मित्रांनो आजचे युद्ध आपणच जिंकणार, जेथे जेथे आपण जाऊ तेथे- तेथे आपला विजय होणार.' कारण आल्या-आल्या या भूमीने मला अलिंगन दिले आहे. मी तुझी आहे, मी तुझी आहे.

मित्रांनो, सैनिकांचे मनोबल वाढले व सगळीकडे मोठी विजयश्री त्यांनी खेचून आणली. हे घडले सकारात्मक दृष्टिकोनामुळे. टेबलावर एक ग्लास पाण्याने अर्धा भरला आहे. जर असा विचार केला, की अर्धा भरला आहे त्यामुळे मन समाधानी होते. पण तो अर्धा रिकामा आहे म्हटले, की नैराश्य, व्याकूळता, हताशपण येते. सकारात्मक दृष्टिकोन मनाला प्रसन्न करून अतिरिक्त ऊर्जा प्रदान करतो. त्यामुळे कर्माला गती प्राप्त होते आणि आत्मविश्वास वाढतो. नकारात्मक विचार मनाला व शरीराला दुर्बल करतो. परिणामी कर्माची गती मंदावते. चुका होतात. हानी होते व यातूनच औदासीन्य येते.

गौतम बुद्धांजवळ एक शिष्य धापा टाकत आला व म्हणाला, की 'भगवान मला गावकऱ्यांनी शिव्या दिल्या.'

बुद्ध म्हणाले, की 'बरे झाले त्यांनी तुला मारले नाही.' तो म्हणाला, की 'भगवान नंतर त्यांनी मला मारले सुध्दा.' भगवान म्हणाले, की 'या मारामुळे तुला काही जखम झाली का?' शिष्य म्हणाला, 'भगवान माझे डोके फुटले आहे.' गौतम बुद्ध म्हणाले, की 'बरे झाले तुझा मृत्यू झाला नाही.' हे ऐकून शिष्य शांतपणे बुद्धांच्या चरणाजवळ शांत बसला.
बुद्धांना हेच सांगायचे होते, की जी घटना घडली त्यापेक्षा वाईट घटना घडू शकली असती. पण ती घडली नाही. यामुळे समाधानी राहा. मी अस्वस्थ आहे, पण लोक माझ्यापेक्षा जास्त अस्वस्थ आहेत, असा विचार मनाची तात्कालीक अस्वस्थता बऱ्याच प्रमाणात नियंत्रित करतो. माजी राष्ट्रपती अब्दुल कलामांना नौदलात भरती होता न आल्यामुळे पुढे ते शास्त्रज्ञ व देशाचे राष्ट्रपती झाले.
काही वेळा अपयश हे महान यशाचे पण सूचक असते. म्हणून सकारात्मक विचार करा व आनंदी राहा. कोण म्हणते जीवनात प्रत्येक वेळी काटेरी डंखंच आहेत. डोळे उघडून बघा प्रत्येकाला उडण्यासाठी फुलपाखरासारखे पंख आहेत.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)